सत्यमेव जयते

महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

## कार्यालय:: विशेष पोलीस महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र, अमरावती.


**माल टेकडी रोड, कॅम्प एरिया,अमरावती-४४४ ६०६ (महाराष्ट्र)**

**दुरध्वनी व फॅक्स क्र.०७२१-२६६३२२६,** ई-मेल क्र.ig.amravatirange@mahapolice.gov.in/

www.igpamravatirange.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :अप/कक्ष-३/पोनि/विनंती बदल्या-२०२२/२०२२- १६५७ अमरावती,दि. 12 3 DEC 2022

**वाचा :- महाराष्ट्र पोलीस अधिनियम-१९५१**

-ooo-

**आदेश**

महाराष्ट्र पोलीस कायदा मधील कलम २२ न (१) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन परिक्षेत्रीय पोलीस आस्थापना मंडळाने जिल्हयातील **विहीत कालावधी पूर्ण न झालेल्या** नि:शस्त्र **पोलीस निरिक्षकांच्या** विनंतीचा सांगोपांग विचारु करुन,विशेष बाब म्हणून त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे बदलीचा निर्णय घेण्यात आला आहे. आहे.

| अ.क्र. | नि:शस्त्र पोलीस निरिक्षकाचे नाव | सध्याचे नेमणुकीचे ठिकाण | नविन बदलीचा घटक |
|---|---|---|---|
| १ | सारंगधर वासुदेव नवलकार | वाशिम | बुलडाणा |
| २ | किरण रावसाहेब वानखडे | वाशिम | अमरावती ग्रा. |
| ३ | माधवराव रावसाहेब गरुड | अमरावती ग्रामीण | बुलडाणा |

**(आस्थापना मंडळाचे मान्यतेने)**

**२.** संबंधीत घटक प्रमुखांनी या बदली आदेशाची प्रत संबंधित नि:शस्त्र पोलीस निरीक्षक यांना तात्काळ बजावून त्यांना तात्काळ कार्यमु क्त करावे. बदली झालेल्या पोलीस निरीक्षकांना कार्यमुक्त करतांना पर्यायी/ बदलीवर येणा-या नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची घटक प्रमुखांनी वाट पाहू नये.

**३.** बदली आदेशातील संबंधीत नि:शस्त्र पोलीस निरीक्षक दरम्यानच्या काळात निलंबित झाले असतील तर अशा निलंबित पोलीस निरीक्षकांना बदली ठिकाणी कार्यमुक्त न करता त्याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सत्वर पाठवावा. तसेच अशी कोणतीही अपवादात्मक परिस्थीती निर्माण झाली असेल तर त्याबाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

**४.** मा.न्यायालय/महाराष्ट्र प्रशासकीय न्यायधिकरण/निवडणूक आयुक्त यांचे आदेशाचा भंग होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

**५.** बदली आदेशानंतर जे नि:शस्त्र पोलीस निरीक्षक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासुन स्थित कार्यमुक्त (Stand Relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

६. बदली आदेशात नेमणूक केलेल्या ठिकाणात अंशत: बदली करणे/बदली रद्द करणे/बदलीस स्थगिती देणे अशा प्रकारच्या विनंत्यांची या कार्यालयातर्फे दखल घेतली जाणार नाही. बदली झालेले नि:शस्त्र पोलीस निरीक्षक बदली आदेशाचे पालन करुन नवीन नेमणूक दिलेल्या ठिकाणी सर्वप्रथम हजर होतील व तेथील घटक प्रमुखांमार्फत त्यांची विनंती नव्याने या कार्यालयास सादर करतील. नविन घटक प्रमुखांच्या शिफारशीशिवाय विनंतीचा विचार केला जाणार नाही.

७.	घटक प्रमुखांनी त्यांच्या घटकात हजर झालेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची नावे व त्यांच्या घटकातुन बदली ठिकाणी कार्यमुक्त केलेल्या नि:शस्त्र पोलीस निरीक्षकांची नावे हजर झालेल्या/कार्यमुक्त केलेल्या दिनांकासह या कार्यालयास कळवावीत. जे नि:शस्त्र पोलीस निरीक्षक बदली ठिकाणी कार्यमुक्त करुनही वेळेत बदलीवर हजर होणार नाहीत, अशा पोलीस निरीक्षकांच्या कार्यमुक्त केल्याचा दिनांक या कार्यालयास कळवुन त्यांच्याविरुध्द घटक प्रमुखांनी शिस्तभंगविषयक कार्यवाही तातडीने सुरु करावी. सदरची माहिती या कार्यालयातील ई-मेलव्दारे पाठवावी.

**(जयंत नाईकनवरे)**
विशेष पोलीस ~~उप~~ महानिरिक्षक,
अमरावती परिक्षेत्र,अमरावती.

प्रति,

पोलीस अधीक्षक,अमरावती ग्रा.,बुलडाणा व वाशिम.

**<u>प्रत माहितीस्तव सविनय सादर:-</u>**

पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई.